# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 12 July 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १२ जूलै २०२५ दुपारी १.०० वा.

****

युवकांना सक्षम बनवून त्यांना रोजगार देण्यासाठी आयोजित मेळाव्यांद्वारे विकसित भारत निर्माण करण्याप्रती केंद्रसरकारची कटिबद्धता अधोरेखित होत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधानांच्या हस्ते सोळाव्या रोजगार मेळाव्याचं, दूरदृश्य प्रणालीद्वारे द्वारे देशातील ४७ शहरांमध्ये आज एकाच वेळी उद्घघाटन करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते.

भारताची लोकशाही आणि लोकसंख्या ही ताकद आज जगासमोर आदर्श असल्याचं पंतप्रधान म्हणाले. नियुक्तीपत्र मिळालेल्या तरुणांना केंद्रसरकारनं कायमस्वरुपी नोकऱ्या प्रदान केल्या असून त्याबद्दल पंतप्रधानांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

****

या शृंखलेत नागपूरच्या दक्षिण पूर्व मध्य रेल्वे विभागाच्या वतीनं उत्तर नागपूर इथल्या मंगल मंडप इथं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते विविध विभागांमधून निवडलेल्या एकूण १४९ उमेदवारांना नियुक्ती पत्राचं वाटप करण्यात आलं. शासकीय नोकरी ही चांगली समाजसेवा आणि देश सेवा करण्याची संधी समजून कर्तव्य पार पाडावं आणि यशस्वी व्हावं, असं आवाहन गडकरी यांनी यावेळी नवनियुक्तांना केलं.

****

छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाच्या यादीत समाविष्ट झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतूक केलं आहे. प्रत्येक भारतीयाला या सन्मानाचा अभिमान असल्याचं पंतप्रधानांनी सामाजिक माध्यमावरील आपल्या संदेशात म्हटलं आहे. या किल्ल्यांना भेट देऊन मराठा साम्राज्याचा समृद्ध इतिहास जाणून घेण्याचं आवाहनही त्यांनी केलं आहे.

****

जम्मू-काश्मीरमधील अमरनाथ यात्रेतल्या सहा हजार सहाशे एकोणचाळीस यात्रेकरूंची ११ वी तुकडी आज सकाळी भगवती नगर यात्री निवास बेस कॅम्प इथून रवाना झाली. २७५ वाहनांमधून प्रवास करणारे सर्व यात्रेकरू बालटाल आणि पहलगाम बेस कॅम्पमध्ये पोहोचतील. या दोन्ही छावण्यांमधून यात्रेकरू अमरनाथ गुहेकडे आपला प्रवास सुरू करतील. दरम्यान, काल १८ हजार दहा यात्रेकरूंनी अमरनाथाचं दर्शन घेतलं. यासह, दर्शन घेणाऱ्या यात्रेकरूंची संख्या एक लाख ६३ हजारांवर पोहोचली आहे.

****

आषाढी यात्रेनिमित्त ५ हजार २०० जादा बसेसच्या माध्यमातून एसटीने साडे एकवीस हजार फेऱ्यांद्वारे तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भाविक - प्रवाशांची सुरक्षित ने-आण केली आणि त्यांना विठ्ठल दर्शन घडवलं आहे. या सेवेतून एसटीला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपयांचं उत्पन्न मिळालं असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. महामंडळानं मागील वर्षीपेक्षा यंदा ६ कोटी ९६ लाख ३ हजार रुपयांनी जास्त उत्पन्न मिळवलं. चांगलं उत्पन्न आणून लाखो भाविकांना सुखरुप देवदर्शन घडवून आणणारे हजारो चालक, वाहक, यांत्रिकी कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकाऱ्यांचं मंत्री नाईक यांनी अभिनंदन केलं.

****

दुसऱ्या महायुद्धातील भारतीय वीर नायक यशवंत घाडगे यांच्या अतुलनीय शौर्यास श्रद्धांजली म्हणून इटलीतील मॉन्टोन शहरात त्यांच्या कांस्य पुतळ्याचं काल अनावरण करण्यात आलं. या भावनिक समारंभात इटालियन लष्करी बँडनं भारत आणि इटलीच्या राष्ट्रगीतांचं सादरीकरण केलं.

****

भंडारा जिल्ह्यात गेल्या तीन दिवसात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पूर आला. त्यामुळे सातही तालुक्यातील तब्बल ४ हजार ९३६ हेक्टरमधील पीकांचं मोठं नुकसान झालं आहे. जिल्हा प्रशासनाने पीक नुकसानीचा प्राथमिक पंचनामा करुन सुधारित अहवाल जाहीर केला आहे.

****

बुलडाणा जिल्ह्यात अतिसाराच्या साथींमुळं आतापर्यंत जवळपास पन्नासपेक्षा अधिक नागरिक बाधित झाल्याचं वृत्त आहे. जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील माटरगाव इथं दुषित झालेलं पिण्याचं पाणी पिल्याने नागरिकांना पोटदुखी, मळमळ, उलट्या जुलाबचा त्रास जाणवू लागला, त्यामुळं त्यांना तातडीनं आरोग्य केंद्रामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

****

भारत आणि इंग्लंड यांच्यात लंडनच्या लॉर्ड्स मैदानावर सुरु असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यातील तिसऱ्या दिवशीचा खेळ आज दुपारी साडेतीन वाजता सुरु होईल. भारत पहिल्या डावात तीन बाद १४५ धावांवरुन आपला खेळ सुरु करेल. कालच्या खेळाच्या शेवटी, केएल राहुल ५३ आणि ऋषभ पंत १९ धावांवर खेळत होते. भारत २४२ धावांनी पिछाडीवर असून इंग्लंडनं आपल्या पहिल्या डावात ३८७ धावा केल्या आहेत.

****

पुढील वर्षी भारत आणि श्रीलंकेत संयुक्तपणे आयसीसी पुरुष टी–२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धा होणार आहेत. या विश्वचषक स्पर्धेसाठी इटलीनं प्रथमच पात्रता मिळवली आहे. नेदरलँड्सनंही या स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. स्वित्झर्लंडमधील हेग इथं काल नेदरलँड्सकडून नऊ विकेट्सनं पराभूत होऊनही इटलीनं या स्पर्धेत पात्रता मिळवली. या विश्वचषक स्पर्धेसाठी आतापर्यंत १५ संघ पात्र ठरले आहेत.

****